**रेडिओ क्लब येथे पर्यटन जेट्टी, टर्मिनल इमारत व तत्सम सुविधा निर्माण करणेबाबत या कामाचे रु.२२९.२८ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास सागरमाला प्रकल्पांतर्गत (लेखाशिर्ष ३०५१ १८९१ मध्ये) सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांकः एमआयएस-०७२३/प्र.क्र.७२/बंदरे-२**

गृह विभाग, मंत्रालय मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १६ फेब्रुवारी २०२४

**वाचा :-** १. शासन निर्णय क्र.एमआयएस-०२२०/प्र.क्र.०९/बंदरे-२, दि.३०.०३.२०२२

२. केंद्र शासनाचे पत्र क्र. C2-25021/1/2020-SM (338448) Date.16.11.2022

२. महाराष्ट्र सागरी मंडळ यांचे दि.२७.०७.२०२३ रोजीचे पत्र

**प्रस्तावना:-**

मुंबई मधील गेटवे ऑफ इंडिया हे महत्त्वाचे पर्यटनस्थळ असून तेथून एलिफंटा, मांडवा, जेएनपीटी, हार्बर क्रूझींग याकरिता अस्तित्वातील ५ जेट्टीचा वापर करुन जलप्रवासी वाहतुक करण्यात येते. दरवर्षी सुमारे ३० ते ३५ लक्ष इतकी प्रवासी /पर्यटन वाहतुक होते. गेटवे येथील अस्तित्वातील जेट्टी सुविधा प्रवाशांकरिता अपुरी पडत असून काही वेळेस प्रवाशांना विशेषतः वृध्द व्यक्ती, स्त्रिया आणि लहान मुले यांना खुप अडचणी निर्माण होतात. प्रवाशांच्या सोयीकरीता गेटवे ऑफ इंडिया येथे जेट्टी बांधणे व त्यालगत सुविधा निर्माण करणे प्रस्तावित होते. परंतु त्यास सुरक्षिततेच्या दृष्टीने नौसेनेने आक्षेप घेऊन प्रस्तावित जेट्टी रेडिओ क्लब नजीक बांधण्यात यावी, असे सूचीत केले. त्यानुसार उक्त कामास सन २०२१-२०२२ च्या राज्य दरसुचीनुसार एकुण १६२.९८ कोटी किंमतीचा ढोबळ अंदाजपत्रकास उपरोक्त संदर्भिय क्र.१ नुसार शासन निर्णय क्र.एमआयएस-०२२०/प्र.क्र.०९/बंदरे-२ दि.३०/०३/२०२२ अन्वये व केंद्र शासनाचे संदर्भिय पत्र क्र.२ नुसार राज्य हिस्सा (५०%) व केंद्राचे हिस्सा (५०%) प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर कामाकरीता निविदा प्रक्रिया राबविली असता त्यास प्रतिसाद मिळाला नाही. तद्नंतर व्दितीय निविदा राबविली असता कंत्राटदार यांनी मूळ रक्कमेच्या एकूण ६६.६६% अधिक दराने प्रक्रिया राबविण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली. तसेच या कामाचे अंदाजपत्रक राज्यदरसुची २०२१-२२ नुसार असून ते चालू राज्यदरसूची २०२२-२३ नुसार अद्यावत केले असता सदर अंदाजपत्रकांची रु.२२९.२७/- कोटी इतक्या रक्कमेने वाढ होत आहे. त्यामुळे रेडिओ क्लब जेट्टी, नवीन प्रवासी टर्मिनल व तत्सम सुविधांची निर्मीती करण्याचा प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

रेडिओ क्लब येथे पर्यटन जेट्टी, टर्मिनल इमारत व तत्सम सुविधा निर्माण करणेबाबत या कामाचे रु.२२९.२८ कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास सागरमाला प्रकल्पांतर्गत या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| **Recapitulation Sheet -** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Description of work** | **Amount – as per original A.A. Dated 30th March 2022** | **Description of work** | **Revised Amount** | **Remark** |
| A | Part A-Work TO be Executed | As per PWD ESSR 21-22 | Part A-Work To be Executed | As per PWD ESSR 2022-23 & MCGM 2023 | |
| 1 | Fixed Walkway & Fixed Jetty (10 nos) | 92,65,67,681.00 | Fixed Walkway & Fixed Jetty (10 nos) | 1,13,49,16,816.00 | 1.Structural Drawing Revised (Pile Diameter & No of pile, Panels etc are changed).<br>2. Liner Thickness is change from 6mm to 12mm.<br>3. Creek Lead is consider 13 nautical miles (24Km) from Belapur.<br>4. Efficiency of RCD is earlier 35%, Now it is consider 80%.<br>5.Consider 2 Flat top Barges, 2,Crane Barges, & 2 Boats.<br>6.Essr Rate updated from 2021-22 to 2022-23 |
| 2 | Terminal Platform & Allied work | | Terminal Platform & Allied work | | |
| a | Terminal Building (container) | 33,99,100.00 | Terminal Building (container) | 37,23,440.00 | Essr Rate updated from 2021-22 to 2022-23 |
| b | Terminal Platform /Parking | 23,59,44,692.00 | Terminal Platform /Parking | 22,98,63,258.00 | 1. Structural Drawing Revised (Pile Diameter & No of pile, Panels etc are changed).<br>2. Liner Thickness is change from 6mm to 12mm.<br>3. Creek Lead is consider 13 nautical miles (24Km) from Belapur.<br>4. Efficiency of RCD is earlier 35%, Now it is consider 80%.<br>5. Consider 2 Flat top Barges, 2,Crane Barges, & 2 Boats.<br>6.Essr Rate updated from 2021-22 to 2022-23 |
| c | Electrical works | 1,62,47,382.00 | Electrical charges | 1,81,78,429.00 | Essr Rate updated from 2021-22 to 2022-23 |
| d | Fire Fighting works | 69,09,492.00 | Fire Fighting works | 77,24,980.00 | 1.Essr Rate updated from 2021-22 to 2022-23<br>2. Creek Lead is consider 13 nautical miles (24Km) from Belapur |
| e | Mechanical (Security Equipment) | 1,26,97,409.00 | Mechanical (Security Equipment) | 1,20,25,629.00 | 1. Essr Rate updated from 2021-22 to 2022-23<br>2.Quotation Items Rate changed. |
| f | Other Infra work facilities | 1,14,50,470.00 | Other Infra work facilities | 1,41,41,031.00 | 1. Essr Rate updated from 2021-22 to 2022-23<br>2. Creek Lead is consider 13 nautical miles (24Km) from Belapur |
| g | Additional Services for Building & Electrical | 4,17,90,767.00 | Additional Services for Building & Electrical | 4,69,29,855.00 | Essr Rate updated from 2021-22 to 2022-23 |
| i | | | Enabling work (Temporary str.Jetty and 2 stacking Platform) | 9,66,30,313.00 | Enabling cost of work is consider in revised scope. |
| **I** | **Sub-Total (Part-I)** | **1,25,50,06,993.00** | **Sub-Total (Part-I)** | **156,41,33,751.00** | |
| B | Quality Control & Testing | | Quality Control & Testing | | |
| 1 | Quality Control | 40,04,430.00 | Quality Control | 77,09,500.00 | Essr Rate updated from 2021-22 to 2022-23 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Liasoning Cost for services | 5,79,452.00 | Liasoning Cost for services | 5,79,452.00 | |
| | | | Land Procurement | | |
| II | Tender Cost (Part I & II) | 1,25,95,90,875.00 | Tender Cost (Part I & II) | 157,24,22,703.00 | 4 |
| | Say... | 1,25,95,90,875.00 | Say... | 157,24,22,703.00 | Labour Insurance is earlier 0.5%, Now it is consider 1% |
| | Add for labour Insurance 0.5% on I | 62,75,035.00 | Add for labour Insurance 1% on I | 1,56,41,338.00 | |
| | Contigencies 4% on I | 5,02,00,280.00 | Contigencies 4% on I | 6,25,65,350.00 | |
| | PMC Charges 3% on I | 3,76,50,210.00 | PMC Charges 3% on I | 4,69,24,013.00 | |
| | Escalation Charges 10% | 12,55,00,699.00 | Escalation Charges 10% | 15,64,13,375.00 | (5% each year as project duration 3 years) |
| | Add 12% GST on I | 15,06,00,839.00 | Add 18% GST on I | 28,15,44,075.00 | GST is earlier 12%, Now it is consider 18% |
| | | | Add 10% provision for provable increase in SSR till approval of project | 15,72,42,270.00 | |
| | **Total Project Cost** | **1,62,98,17,938.00** | **Total Project Cost** | **229,27,53,124.00** | |
| | | **162.98 Cr.** | | **229.28 Cr** | |

२. **सदरहू सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटीच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे-**

*अ) सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादितच काम पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी.*

*ब) योजनेची अंमलबजावणी करताना प्रचलित शासन निर्णय, नियम, CVC तत्सम वित्तीय मर्यादा, विहित निविदा कार्यपध्दती अनुसरण्याबाबत आवश्यकतेनुसार राज्य तांत्रिक सल्लागार समितीने प्रकल्पाच्या व कामाच्या अनुषंगाने दिलेल्या निदेशांचे व त्रुटींची पुर्तता करावी याची सर्वस्वी जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांची राहील.*

*क) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील अहवालातील तांत्रिक बाबी, निविदा विषयक क्षेत्रिय निर्णय किंवा अनियमितता यास मान्यता गृहित धरल्या जाणार नाही. अशा प्रकरणाची तपासणी त्यावेळच्या प्रचलित शासन नियमानुसार करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांची राहील.*

३. या कामावरील होणारा खर्च “मागणी क्र.बी-७, ३०५१-बंदरे व दिपगृहे, लहान बंदरे, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य, (००)(०३) जेट्टीच्या बांधकामाकरिता केंद्राचे सहाय्य (सागरमाला) (कार्यक्रम) (राज्य हिस्सा ५० टक्के), ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान (३०५१ १८९१)” या लेखाशिर्षाखाली मंजुर तरतुदीतून भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय व्यय अग्रक्रम समितीच्या दि.०६.०२.२०२४ रोजीच्या बैठकीबाबत वित्त विभागाच्या पत्र क्र.सुप्रमा-२०२४/प्र.क्र.११/अर्थ-२, दि.१४.०२.२०२४ अन्वये निर्गमित केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२१६१५१७१५१५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILIMA MAHADEV KAMBLE

Digitally signed by NILIMA MAHADEV KAMBLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=0a1748b905e770db90369b30966380ad4482c802aeb9a208c0273473e9c24d7e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B635A0BA362D807D0A2AD2942C69531FAFE53ABFCAC9AB809231BD295B40EBE2, cn=NILIMA MAHADEV KAMBLE
Date: 2024.02.27 16:48:30 +05'30'

**( निलीमा कांबळे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (बंदरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.
३. प्रधान सचिव (बंदरे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय-८/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई-३२.
८. नियोजन विभाग (का. १४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
१०.निवडनस्ती (बंदरे-२)